विषय : कचरा वर्गीकरण व खत निर्मीती करण्याबाबत सक्तीची नोटीस.

सदंर्भ : १) परिपत्रक : उपायुक्त/घकव्य/१६५८ दिनांक १८.०७.२०१७.

२) क्र.सआ.जं.उ/२०४/ओडी/जनरल.दिनांक २९.०७.२०१७.

उपरोक्त संदर्भान्वये आपणास या सक्तिच्या नोटीस द्वारे बजावण्यात येत आहे की मुंबई महानगरपालिकेच्या "कचरा वर्गीकरण व खत निर्मिती" या विषयावर जी/उत्तर विभागात सातत्याने जनजागृती करण्यात येत असून आपल्या सोसायटीला या पूर्वीही नोटीस दिलेली आहे. घन कचरा व्यवस्थापन जी/उत्तर विभागातील अधिका-यांनी कचरा वर्गीकरण व खत निर्मीती बाबत खुलासेवार अवगत करुन देखिल आपल्या सोसायटीमध्ये ओला कचरा व सुका कचरा पूर्णता वेगळा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ओल्या कच-यापासून खत निर्मीती होत असतानाचेही दिसत नाही. जी/उत्तर विभागाद्वारे यासाठी दर गुरुवारी सोसायटीच्या सदस्यांशी संवाद साधून ओल्या कच-याचे विघटन करण्यासाठीच्या विविध पर्यायांबाबत आपणांस माहीती उपलब्ध करुन दिली आहे. तथापि अद्यापपर्यंत म.न.पा.च्या या नोटीसची आपण दखल घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. दि.०२ ऑक्टोबर पासून आपल्या परिसरातील ओला कचरा व सुका-मिश्रित कचरा महानगरपालिकेचे वाहन उचलणार नाही. सदर बाब अंत्यंत गंभीर स्वरुपाची असून या नोटीस नंतर आपल्या सोसायटीतील कच-याचे विघटन आपण स्वत: करण्यासाठी पुढाकार घेत नसाल तर आपला कचरा तर उचलला जाणार नाही, तसेच आपण सदर नोटीसीची दखल न घेतल्याने आपणावर खालील कायद्यांअन्वये गुन्हे दाखल करण्यात येतील याची नोंद घेणे.

१.पर्यावरण संवर्धन कायदा १९८६.

२.हरित मुंबई कायदा २००६.

३.पर्यावरण खात्याच्या कायदयांचे पालन न करण्याप्रत्यर्थ कायद्याअंतर्गत तरतुदीनुसार.

४. महाराष्ट्र शासनाच्या नियमावलींचा भंग करण्याप्रत्यर्थ कलम,१२४ व एम.आर.टी.पी कायदा १९६६ यु.डी.विभाग. परीपत्रक मनपा २५१६/सीएएस कृर.२१८/यु.डी.२१/दि.१५.०२.२०१६.

५. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ क्र.एमपीसीबी/आरओ(झेडक्युएच)बी/४६६९/दि.३०.०७.२०१२.

६.दंडात्मक कारवाई कलम ४७१आणि ४७२.म.न.पा कायदा

७.कलम ३६८ मनपा कायदा.

८.दंडात्मक कारवाई कलम -४६१-मनपा कायदा.

९. मा.आयुक्तांचे परीपत्रक यु/क्र.एमजीसी/एफ/४०३२/दि.१४०७.२०१७.

१०.घ.क.व्य नियमावली २०१६.

उपरोक्त कलमांन्वये आपल्या सोसायटी/हॅटिल/मॉल/टॉवर इत्यादी ठीकाणांवर घकव्य नियमावलीचे उल्लंघन केल्यास गुन्हे नोदं होउ शकतात. वरील बाबींची गंभीरपणे दखल घेउन आपल्या परिसरातच कचरा वर्गीकरण व खत निर्मिती करणे, व महानगरपालिकेच्या सुका कचरा वाहनाला सुका कचरा देणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. अन्यथा दिनांक ०२ ऑक्टोबर २०१७ पासून आपल्या परिसरातील ओला कचरा व सुका-मिश्रित कचरा महानगरपालिकेचे वाहन उचलणार नाही,याची नोंद घ्यावी.